https://lokadesh.in
विशेषांक
मूल्य १.०० रु.
# लोकादेश
संपादक : साजीद बडगुजर
RNI No.MAHMAR/2007/20732 Post.Reg.No.G-2/RNP/NND-323/2023-2025
किनवट, वर्ष १७ वे अंक ३३ वा, गुरूवार, दि.०८ ऑगस्ट २०२४, पाने ४





# सामाजिक भेद मिटवणे हे मूळ उद्दीष्ट, मग आरक्षण ही गरीबी हटाव योजना कशी असू शकते?

**आरक्षणाचे तत्व हे सामाजिक भेदाभेद नष्ट व्हावा यासाठी होते, पण आर्थिक दृष्टीने मागासवर्गीय ही संकल्पना आणून आरक्षण या संकल्पनेला मूळ उद्देशापासून दूर नेण्याचा प्रयत्न केला गेला.**

भारतासारख्या देशात जातीजातींमध्ये भेदाभेद होता. काहींना माणूस म्हणून जगण्याचाही अधिकार नाकारला गेला होता. पाच हजार वर्षांपासून त्यांचे अधिकार उच्चवर्णीयांनी बळकावले होते. काही जाती तर अस्पृश्यतेचे चटके आयुष्यभर अनुभवत आल्या. १९४७ मध्ये स्वातंर्त्याची पहाट उगवली आणि या सर्वांना वाटले की आता तरी आपले अधिकार आपल्याला मिळतील. त्यांच्या जीवनामध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरसारखा क्रांतीसूर्य आला होता म्हणूनच त्यांच्या जीवनात आशेचा किरणा आला होता. बाबासाहेबांमुळे त्यांच्या जीवनामध्ये फरक पडायला सुरुवात झाली. नोकरीमध्ये त्यांना आरक्षण मिळू लागले. त्यामुळे त्यांना काही प्रमाणात प्रतिनिधित्व मिळायला लागले. पण नोकरी मिळायला लागली ती मात्र सर्वात निम्न स्वरुपाची. त्यात काही अगदी बोटावर मोजण्याएवढे लोक वरच्या स्तरात गेले. पण त्यातही महत्वाची पदे त्यांना मिळू शकली नाहीत. कारण त्यात महत्वाचा खोडा होता, तो म्हणजे त्यांची जात. तरीही याच समाजांमधून काही लोक वरच्या पदांवर गेले, पण ते आपला भूतकाळ विसरले. स्वतःला उच्च वर्ण समजू लागले. त्यांच्या बोलण्यात हो ला हो मिळवू लागले. त्यात काही समाजाप्रति जागरूक होते. ते त्यांच्या परीने प्रयत्न करीत होते पण ही संख्यासुद्धा अगदी बोटावर मोजण्याएवढी. त्यामुळे या व्यवस्थेविरूद्ध लढण्यात त्यांना मर्यादा आल्या आणि याचाच फायदा घेऊन उच्चवर्णीय पुन्हा एकदा या देशात सर्व क्षेत्रांत महत्वाच्या जागा बळकावण्यात समर्थ ठरले. मागील ७५ वर्षांत खरोखरच तळच्या स्तरांतील, वेगवेगळया जातीजमातीतील लोकांना योग्य प्रतिनिधित्व मिळाले की नाही याचा कोणी विचार केला नाही. सर्वांनी फक्त आपल्या राजकारणासाठी त्यांचा वापर केला. आजही कितीतरी जागा रिक्त आहेत. तरीही अनुसूचित जाती-जमातीतील उमेदवार असले तरीसुद्धा ते नॉट सुटेबल आहेत, असा शेरा देऊन ती जागा रिक्त ठेवली जाते. त्यानंतर ती जागा खुल्या वर्गासाठी खुली केली जाते. अशा रितीने मागास, वंचित वर्गाच्या तोंडातील घास हिरावून घेतला जातो.

कितीतरी लोकांनी जातीचे खोटे प्रमाणपत्र बनवून खरोखर त्या जातीत असलेल्या लोकांचे हक्क हिरावून घेतले आहे. न्यायालयात या केसेस गेल्या, पण आजपर्यंत एकाही व्यक्तीला शिक्षा झाली नाही. याउलट जातीचे खोटे प्रमाणपत्र देणाऱ्याला संरक्षण दिले जाते, कारण काय तर त्याला आता नोकरीतून काढले तर त्याचे घर उघड्यावर पडेल. खरे म्हणजे अशा लोकांना तुरुंगात पाठवायला पाहिजे, पण आजपर्यंत तसे कधीही झाले नाही. जातीचे खोटे प्रमाणपत्र देणाऱ्यांच्यामुळे ज्यांच्या संधी गेल्या, जे तळागाळातच राहिले, त्यांचा कधीही विचार होत नाही. अशा प्रकारे आरक्षण ही फक्त दिखाव्याची गोष्ट होती, या सगळ्या काळात त्याची नीट अंमलबजावणी कधीच झाली नाही.




जातींचे पुन्हा वर्गीकरण करा आणि ज्यांना अजून प्रतिनिधित्व मिळाले नाही त्यांना प्रतिनिधित्व द्या असा आता सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिला आहे. पण आधीचेच आरक्षण नीट द्यायचे काम पूर्ण व्हायचे आहे आणि त्यात पुन्हा बदल करा असे फक्त वर्षांत म्हणणे ही खूपच घाई होत आहे.

काहींचे म्हणणे असे आहे की ज्यांना आरक्षण मिळाले त्यांच्या मुलांना आता आरक्षण द्यायची गरज नाही. जे आयएएस झाले त्यांच्या मुलांना तर नकोच आरक्षण असे त्यांचे म्हणणे. यामागे तळच्या जातीतून असे अधिकारी झाले हीच खरी पोटदुखी आहे. पण मागील ७५ वर्षांत किती असे अधिकारी झाले आणि त्यांची किती मुले आपल्या आईवडिलांप्रमाणे अधिकारी झाली, याचासुद्धा अभ्यास होण्याची गरज आहे. ही संख्यासुद्धा जास्त असणार नाही पण अशा अधिकारी वर्गाकडे पाहून संपूर्ण जातीला वेठीस धरणे योग्य आहे का? आजही देशातील काही भागात सरकारमध्ये अधिकारपदावर असलेल्या व्यक्तीला तिच्या जातीमुळे राहण्यासाठी भाड्याने घर द्यायला काही लोक तयार होत नाहीत. मग अशा लोकांच्या बाबतीत ते क्रीमी लेअरमध्ये आहेत असे कसे म्हणता येईल? मुळात आरक्षणाचे तत्व हे सामाजिक भेदाभेद नष्ट व्हावा यासाठी होते, पण आर्थिक दृष्टीने मागासवर्गीय ही संकल्पना आणून आरक्षण या संकल्पनेला मूळ उद्देशापासून दूर नेण्याचा प्रयत्न केला गेला. जातींमध्ये वर्गीकरण करावे अशी मागणी कोणाची होती? त्यासाठी किती लोक रस्त्यावर आले? न्यायालयात असलेल्या मूळ प्रकरणातील मागणी काय होती? या प्रकरणात अनुसूचित जाती जमातीमधील किती लोक होते? या बाबत लोकांकडून प्रतिक्रिया मागवल्या होत्या का? सरकारचे याबाबत काय म्हणणे होते ? आदेश देताना आरक्षणाचे मूळ तत्त्व पाहिले होते का? एखाद्या जातीतून एखादा मोठा अधिकारी निर्माण झाला, तर पूर्ण जातीचा उद्धार होतो का? या आदेशाचा परिणाम व्यापक होणार आहे तेव्हा अनुसूचित आयोगाचे म्हणणे लक्षात घेतले का? मोठ्या अधिकाऱ्यांची मुलेदेखील अभ्यासात हुशार असतातच असे असते का? असे बरेच प्रश्न आता निर्माण होत आहे.

गरिबी हटविण्यासाठी सरकारने निरनिराळ्या योजना आणल्या आहेत. त्यामुळे काहींचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी मदत होत आहे. त्यामुळे आरक्षणामध्ये उत्पन्न या घटकाचा आधार घेणे योग्य नाही. नाहीतर पुढे खुल्या वर्गातही हा घटक लावावा लागेल. त्यामुळे आरक्षणाच्या मूळ उद्देशाकडे लक्ष देणे खूप आवश्यक आहे. या आदेशाचा आधार घेऊन पुढे फक्त आर्थिक आधारावर नोकरीमध्ये संधी दिल्या जाणार काय हा महत्वाचा प्रश्न आहे. असे प्रश्न भविष्यामध्ये निर्माण होऊ नयेत, यासाठी आजच योग्य उत्तर शोधणे आवश्यक आहे.

सौजन्य : दै.लोकसत्ता

---

## मतदारांनो ! विधानसभा मतदार यादीतील नावांची खातरजमा करा

# प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध ;१० व ११ तसेच १७ व १८ ऑगस्टला नोंदणीची अखेरची संधी

## ३० ऑगस्टला विधानसभेच्या मतदारांची अंतिम यादी जाहीर होणार



नांदेड, दि. ६ ऑगस्ट : नांदेड जिल्ह्यातील किनवट, हदगाव, भोकर, नांदेड उत्तर, नांदेड दक्षिण, लोहा, नायगाव, देगलूर व मुखेड विधानसभा मतदारसंघाच्या प्रारूप मतदार यादी तयार झाली आहे. राजकीय पक्षापासून सामान्य नागरिकांपर्यंत प्रारूप यादी सर्वांसाठी खुल्या असून नागरिकांनी आपआपल्या नावाची तपासणी करून घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले आहे.

मतदानाच्या दिवशी आपले नाव मतदान यादीमध्ये नाही, मयत, मृतकांची नावे आहेत, अशा तक्रारी वारंवार करण्यात येतात.मात्र मतदानाच्या पूर्वी निवडणूक विभागामार्फत ज्या मतदान याद्या तयार होतात, त्याबाबत सामान्य नागरिकांनी राजकीय पक्षांनी जागरूकपणे लक्ष वेधणे आवश्यक आहे,अशी सूचना प्रशासनाने केली आहे. याबाबत दावे व हरकती स्वीकारण्याचा कालावधी ६ ऑगस्ट २०२४ मंगळवार ते २० ऑगस्ट २०२४ मंगळवारच्या दरम्यान असणार आहे, याचा सर्वांनी लाभ घ्यावा असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

मतदार नोंदणी संदर्भातील प्रारूप याद्यांची माहिती आज प्रकाशित आली आहे. राजकीय पक्षाच्याही बैठकही वेळोवेळी घेण्यात आल्या आहेत. त्यामुळे प्रारूप तपासून यामधील नावे वगळणे , नव्याने समाविष्ट करणे, मतदान केंद्र व त्याची माहिती करून घेणे सर्व शक्य आहे. यासाठी मतदार व राजकीय पक्षांनी लक्ष वेधणे आवश्यक आहे.

**या ठिकाणी बघा प्रारूप याद्या**

नांदेड जिल्ह्यातील ८३ -किनवट, ८४- हदगाव, ८५ -भोकर, ८६ - नांदेड उत्तर ,८७- नांदेड दक्षिण, ८८-लोहा, ८९ -नायगाव, ९०- देगलूर व ९१-मुखेड या मतदारसंघातील प्रारूप मतदार यादी मतदान नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय, तसेच सहाय्यक नोंदणी अधिकारी तहसीलदार यांचे कार्यालय व सर्व पदनिर्देशित ठिकाणी तसेच जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे सहा ऑगस्ट रोजी प्रसिद्ध भारत निवडणूक आयोगाच्या निर्धारित कार्यक्रमानुसार प्रसिद्ध करण्यात आली आहे.

**२० ऑगस्टपूर्वी आक्षेप नोंदवा**

निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार एक जुलै २०२४ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार याद्यांचा दुसरा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम आगामी विधानसभा निवडणूक डोळ्यापुढे ठेवून सुरू झाला असून त्या अंतर्गत ही दुसरी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाली आहे. यासंदर्भात कोणाला आक्षेप असल्यास २० ऑगस्ट पूर्वी राजकीय पक्ष किंवा सामान्य नागरिक आपला अर्ज दाखल करू शकतात.

**शनिवार, रविवारी मतदान केंद्रावर अर्ज करा**

ज्यांची नावे मतदान यादीमध्ये नाही त्यांनी दिनांक १० व ११ ऑगस्ट तसेच १७ व १८ ऑगस्ट या शनिवार रविवारी येणाऱ्या दिवसाला आपले अर्ज भरून द्यावेत. प्रत्येक विधानसभा मतदार संघात नियमित जे मतदान केंद्र आहेत त्या ठिकाणी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी उपस्थित राहणार असून नागरिक या ठिकाणी यादीमध्ये आपली नावे समाविष्ट करू शकतात. जिल्ह्यातील नऊ विधानसभा क्षेत्रामध्ये या ठिकाणी मतदार अर्ज स्वीकारले जाणार आहे.

**फॉर्म ६, ७, ८ भरण्याची सुविधा**

फॉर्म ६ भरून नव्याने मतदार यादी मध्ये नाव समाविष्ट करता येते. फॉर्म ७भरून यादीतून नाव वगळता येते. फॉर्म क्रमांक८ भरून मतदार यादीतील नावाची दुरुस्ती व अन्य बाबी करता येतात. २० ऑगस्ट रोजी अर्ज स्वीकारण्याची मुदत संपणार आहे. त्यानंतर सर्व अर्जांची तपासणी होऊन पुन्हा ३० ऑगस्ट रोजी अंतिम मतदार यादी प्रकाशित केली जाणार आहे. या मतदार यादीच्या आधारेच आगामी विधानसभा निवडणुकीचे मतदान घेण्यात येणार आहे.



**केंद्रस्तरीय अधिका-याला सहकार्य करा**

मृत (मयत) मतदारांची नावे वगळण्यासाठी मयताच्या कुटुंबातील सदस्यांनी फॉर्म नंबर सात भरून देणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे गावातील ग्रामसेवक यांनी जन्म मृत्यू नोंदवही प्रमाणे मयत मतदारांची नावे वगळण्यासाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांना जन्म मृत्यू नोंदवहीची प्रमाणित प्रत उपलब्ध करून दयावी.जन्म मृत्यू नोंदवहीमध्ये एखाद्या मयत मतदाराची नोंद नसल्यास मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांनी स्थानिक चौकशी व पंचनामा करून मयत मतदारांची नावे वगळण्याची कार्यवाही या विशेष मोहिमे दरम्यान करावयाची आहे. त्यासाठी संबंधित गावातील सर्व नागरिक, राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, राजकीय पक्षांनी नियुक्त केलेले मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी यांनी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांना आवश्यक ते सहकार्य करावयाचे आहे. या संदर्भात कोणीही हयगय करूनये, केंद्रस्तरीय अधिकारी, ग्रामसेवक यांनी यातील आपली जबाबदारी ओळखावी असेही जिल्हाधिका-यांनी स्पष्ट केले आहे.

---

# कायदे बदलाचे क्रांतीकारी पाऊल समजण्यासाठी मल्टीमीडिया चित्र प्रदर्शन उपयोगी : प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सुरेखा कोसमकर यांचे प्रतिपादन

## दोन दिवसीय प्रदर्शनाचे थाटात उद्घाटन

नांदेड दि. ७ ऑगस्ट : ब्रिटिश कालीन कायदे बदलविण्याची ही योग्य वेळ असून त्या दृष्टीने पडलेले पाऊल म्हणजे एक जुलैपासून नवीन कायद्याची सुरू झालेली अंमलबजावणी. विधीक्षेत्रातील हे क्रांतिकारी पाऊल असून अतिशय सोप्या शब्दात या प्रदर्शनामध्ये त्याची मांडणी केली आहे. सामान्य माणसासाठी हे प्रदर्शन उपयोगी असून त्याचा लाभ सर्वांनी घ्यावा, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष नांदेड जिल्हा विधी सेवा प्राधिकरण श्रीमती सुरेखा कोसमकर यांनी आज येथे केले.

नवीन फौजदारी कायदे-२०२३ विषयी जिल्हा व सत्र न्यायालयात ७ आणि ८ ऑगस्ट रोजी मल्टीमिडिया चित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.केंद्र शासनाच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या नांदेड येथील केंद्रीय संचार ब्यूरो,जिल्हा विधि सेवा प्राधिकरण, जिल्हा व सत्र न्यायालय नांदेड आणि नांदेड जिल्हा माहिती कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने नवे फौजदारी कायदे- २०२३ (New Criminal Law-२०२३) या विषयावर जिल्हा व सत्र न्यायालय, नांदेडच्या परिसरात ७ व ८ ऑगस्ट २०२४ रोजी दोन दिवशीय मल्टिमिडिया चित्र प्रदर्शन लोकप्रबोधनासाठी सज्ज झाले असून त्याचे आज अधिकृत उद्घाटन करण्यात आले.

या उद्घाटन सोहळ्याला प्रमुख जिल्हा न्यायाधीश श्रीमती सुरेखा कोसमकर यांच्यासह जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा पोलीस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे, जिल्हा सरकारी वकील रणजीत देशमुख, नारायणराव चव्हाण विधी महाविद्यालय नांदेडचे राजवंत सिंग, शरदचंद्र पवार विधी महाविद्यालयाचे शेषराव चव्हाण, जिल्हाविधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव श्रीमती दलजीत कौर जज, जिल्हा माहिती अधिकारी प्रविण टाके, क्षेत्रीय प्रचार अधिकारी माधव जायभाये, सहायक प्रचार अधिकारी समित दोडल आदींची उपस्थिती होती.



यावेळी बोलताना न्यायाधीश सुरेखा कोसमकर यांनी विधि क्षेत्रातील या क्रांतिकारी पाऊलाला समजून घेण्यासाठी साध्या सोप्या भाषेमध्ये ही प्रदर्शन उपयुक्त ठरणार असल्याचे स्पष्ट केले. नांदेड शहरातील विविध विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी तसेच विधि क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहाल्याबद्दल त्यांनी सर्वांचे कौतुक केले. तसेच या कायद्याची माहिती सामान्य माणसापर्यंत पोहोचवण्यासाठी प्रदर्शन पाहणा-या प्रत्येकाने माध्यम बनावे असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी नवीन कायद्याची जनजागृती सक्रियतेने होणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन केले.त्या दृष्टीने केंद्रीय संचार ब्यूरो,जिल्हा विधि सेवा प्राधिकरण, जिल्हा व सत्र न्यायालय नांदेड आणि नांदेड जिल्हा माहिती कार्यालय यांनी चांगला पुढाकार घेतला, असल्याचे सांगितले. कायदे जनतेपर्यंत गेले पाहिजे. या कायद्या संदर्भात सामान्य नागरिकांना पडणाऱ्या प्रश्नांचे निरसनही झाले पाहिजे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी यावेळी संबोधित करताना पोलीस विभागाकडून सुरू असलेल्या या कायद्याच्या प्रचार प्रचाराची माहिती दिली. कायद्यामधील नव्या बदलाने जलद न्याय मिळण्यात मदत होईल तसेच अशा प्रदर्शनीच्या माध्यमातून या नव्या बदलांबद्दल काही शंका असतील तर त्याचेही निरसन होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्षेत्रीय प्रचार अधिकारी माधव जायभाये तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सहायक प्रचार अधिकारी सुमित दोडल यांनी केले.

**आज व उद्या प्रदर्शन खुले**

अतिशय आकर्षक सजावट करण्यात आलेले व सोप्या भाषेत साकारण्यात आलेले हे प्रदर्शन हे प्रदर्शन सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यंत सर्वांसाठी विनामूल्य खुले असणार आहे. आज आणि उद्या दिनांक आठ ऑगस्टला विद्यार्थी,कायद्याचे तज्ञ, कायदेविषयक क्षेत्रामध्ये आवड असणारे अभ्यासक, तसेच सामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

या प्रदर्शनात भारतीय न्याय संहिता २०२३, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ व साक्ष्य अधिनियम २०२३ या कायद्याविषयी माहिती मल्टिमिडीया व एलईडी वॉलच्या माध्यमातून संक्षिप्त स्वरूपात प्रदर्शित करण्यात आली आहे.

हे नवीन कायदे देशात १ जुलै २०२४ पासून लागू करण्यात आले आहेत, हे कायदे पुर्वीच्या भारतीय दंड संहिता(आयपीसी) व फौजदारी प्रक्रीया संहिता (सीआरपीसी) आणि भारतीय पुरावा कायदा यांची जागा घेणार आहेत.या नवीन कायद्यामध्ये काही कलम हटविण्यात आली असून काही नवीन कलम जोडण्यात आली आहेत. या कायद्यामुळे पोलीस,वकील, न्यायालय तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या कार्यपध्दतीत मोठा बदल होणार आहे.

---

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमुळे महिलांमध्ये आर्थिक स्वावलंबनाची क्रांती-आदिती तटकरे





**नांदेड दि. ७ ऑगस्ट : अत्यल्प आर्थिक उत्पन्न गटातील महिलांसाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना आर्थिक स्वातंर्त्याची नवी क्रांती आहे. स्वतःचे बँक अकाउंट, स्वतःच्या खात्यामध्ये स्वतःचे पैसे, या स्वावलंबित्वामुळे, सक्षमतेमुळे समस्त राज्यात महिला जगतामध्ये उत्साहाचे वातावरण असल्याचे प्रतिपादन राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती वरदा सुनील तटकरे यांनी आज येथे केले.**

नांदेड जिल्ह्यातील हदगाव व भोकर येथील महिला मेळाव्यासाठी आज त्यांचे नांदेडच्या श्री. गुरुगोविंद सिंगजी विमानतळावर दुपारी चार वाजता आगमन झाले. त्यानंतर जिल्ह्यातील दोन्ही मेळाव्यात बोलताना त्यांनी रक्षाबंधनपूर्वी १६ व १७ ऑगस्टला महिलांच्या खात्यामध्ये पैसे जमा होतील याची शाश्वती दिली. राज्यामध्ये एक कोटी ४० लक्ष अर्ज आजपर्यंत प्राप्त झाले आहेत. त्यापैकी सव्वा कोटी अर्ज पात्र ठरले आहे. या सर्व पात्र उमेदवारांच्या खात्यामध्ये रक्षाबंधनाला पैसे जमा होतील असे त्यांनी स्पष्ट केले.

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांचे या योजनेकडे अतिशय बारकाईने लक्ष आहे. अर्थमंत्री अजित पवार यांनी यासाठी भरीव आर्थिक तरतूद केली आहे. या योजनेचा पहिला टप्पा ३१ ऑगस्ट पर्यंत पूर्ण होईल. मात्र त्यानंतर ही योजना निरंतर सुरू असेल. अर्ज उशिरा दाखल झाला तरीही जुलै व ऑगस्ट अशा दोन महिन्याचे पैसे महिलांच्या अकाउंटमध्ये जमा होतील, ही बाबही त्यांनी महिलांच्या प्रतिसादात दोन्ही मेळाव्यात स्पष्ट केली.

या योजनेसाठी काम करणाऱ्या अंगणवाडी सेविकांचे कोणतेही प्रश्न बाकी राहणार नाही यासाठी शासन कटीबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. राज्य शासनाने पहिल्यांदाच अशासकीय कर्मचारी असणाऱ्या अंगणवाडी सेविकांना प्रत्येक कर्जासाठी पन्नास रुपये प्रोत्साहन भत्ता दिला आहे. याशिवाय प्रत्येक अंगणवाडी सेविकेला देखील आपला अर्ज दाखल करता येणार आहे. त्यामुळे अंगणवाडी सेविकेने पहिले स्वतःचा अर्ज दाखल करावा व इतर महिलांनाही त्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

हदगाव आणि भोकर या दोन्ही ठिकाणी आयोजकांनी शासन महिलांसाठी अनेक योजना आणत असल्याचा उल्लेख सुरुवातीला केला. तो धागा पकडून आदिती तटकरे यांनी राज्य शासनाने केवळ महिलांसाठीच नाही तर लाडक्या भावासाठी सुद्धा योजना आणली आहे. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेमध्ये या ठिकाणी जमलेल्या तमाम युवकांनी सहभागी व्हावे. सहा महिन्याच्या प्रशिक्षणाची व अर्थार्जनाची तरतूद असणारी ही योजना, मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना, लेक लाडकी योजना, बाल संगोपन योजना, अशा अनेक योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी अधिकारी कर्मचाऱ्यांनी प्रयत्न करावे,अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

तत्पूर्वी नांदेड विमानतळावर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल, उपविभागीय अधिकारी डॉ.सचिन खल्लाळ,महिला व बालकल्याण अधिकारी रेखा कदम यांनी त्यांचे स्वागत केले.यावेळी जिल्ह्यात सुरू असलेल्या बालिका पंचायत उपक्रमातील बालिका सरपंचांशी मंत्र्यांनी चर्चा करून या उपक्रमाची माहिती जाणून घेतली घेतली.

---

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ; पोर्टलवर ४.७३ लक्ष नोंदी

## नांदेड जिल्ह्यात ५६ टक्के अर्जांची छाननी पूर्ण

नांदेड दि. ५ ऑगस्ट : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला जिल्ह्याच्या ग्रामीण भागामध्ये उदंड प्रतिसाद मिळत आहे. संपूर्ण यंत्रणा सध्या अर्ज ऑनलाईन करणे व मंजुरी देणे या कामात व्यस्त असून जिल्ह्यातील आत्तापर्यंत दाखल ४ लाख ७३ हजार १२३ अर्जापैकी दोन लक्ष ६८ हजार ९५५ अर्ज तालुका समितीने मंजूर करून जिल्हास्तरीय समितीकडे पाठविले आहे. थोडक्यात ५६ टक्क्यांपर्यंत अर्जांना प्राथमिक मंजुरी मिळाली आहे.

दरमहा, दीड हजार रुपये म्हणजेच वर्षाला १८ हजार रुपये महिला भगिनींना थेट बँक खात्यात देणाऱ्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी एकीकडे अर्जदारांची लगबग सुरु असतानाच प्रशासन हे सर्व अर्ज नारी शक्ती दूत पोर्टलवर अपलोड करण्यामध्ये व परिपूर्ण प्रस्तावाना मंजुरी देण्यात व्यस्त झाले आहे.अर्ज अचूक अपलोड करण्यात यावे. याकडे लक्ष वेधण्याचे आवाहन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले आहे.



नांदेड जिल्हयाची पुढे आलेली आकडेवारी बघता आतापर्यंत ५६ टक्के अर्जांची पडताळणी करण्यात आली आहे. दाखल केलेल्या अर्जांपैकी २ लक्ष ६८ हजार ९५५ अर्जाना तालुकास्तरावरून मंजुरी देण्यात आली आहे. पोर्टलवर अपलोड करताना त्रुटी आल्यामुळे नामंजूर झालेल्या अर्जाची संख्या फक्त ३७१ आहे. आता या अर्जाना जिल्हास्तरीय समिती तपासणी नंतर मान्यता देणार आहे.

ऑनलाइन ऑफलाइन अर्ज गोळा करण्यामध्ये व पोर्टलवर भरण्यामध्ये सर्वात प्रभावीपणे मुखेड तालुक्याने काम केले आहे. या तालुक्यात ऑफलाइन व ऑनलाईन एकूण ३४ हजार ५४४ अर्ज दाखल झाले. यापैकी ३४ हजार २०२ अर्ज अपलोड करून तालुका समितीने मान्य केले आहे. ही टक्केवारी ९९ टक्के आहे. जिल्ह्याची सरासरी टक्केवारी ५६ असताना मुखेड तालुक्याने अतिशय उत्कृष्टपणे काम केले असल्याने प्रशासनाने टिम मुखेडचे कौतुक केले आहे.

सर्वाधिक अर्ज नांदेड तालुक्यामध्ये दाखल झाले आहेत. ही संख्या ७७ हजारावर आहे. तर सर्वात कमी अर्ज धर्माबाद तालुक्यामध्ये आहे ही संख्या केवळ १२ हजार आहे. दरम्यान, पात्र ठरलेले ५६ टक्के अर्ज प्राथमिक तपासणीनंतर तालुका स्तरीय समितीला योग्य वाटत असले तरी या संदर्भातील अंतीम निर्णय जिल्हास्तरीय समिती घेणार आहे.

जिल्ह्यातील ज्या पात्र महिला या योजनेसाठी लाभार्थी ठरू शकतात त्या सर्व महिलांनी अर्ज दाखल करावे. ३१ ऑगस्ट पर्यंत अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख असली तरी ही प्रक्रिया निरंतर सुरू असेल. तथापि, ३१ ऑगस्ट पर्यंत अर्ज दाखल करणा-यांना जुलै व ऑगस्ट महिन्यांचे पैसे रक्षाबंधनला मिळणार आहेत. त्यामुळे प्रशासनाने अतिशय गतीने ऑनलाइन पद्धतीने अर्ज अपलोड करणे सुरू केले आहे.

# ग्रामस्तरीय अधिका-यांना प्रशासकीय वस्तुनिष्ठ माहिती द्यावी, नागरीकांनी सर्व विभागप्रमुखांना साथ देऊन विकास साधावा-सहायक जिल्हाधिकारी कावली मेघना




लोकादेश न्यूज, किनवट : जनता व प्रशासन यातील महत्वाचा दुवा असलेल्या ग्रामस्तरावरील तलाठी व ग्रामसेवक यांनी आपल्या वरिष्ठांना कोणतीही माहिती वस्तुनिष्ठपणे द्यावी. त्यावरूनच प्रशासकीय अधिकाऱ्यांना सर्वसामान्यांच्या हितासाठी शासनाच्या योजना थेट त्यांच्यापर्यंत यशस्वीपणे पोहचविता येतील. तसेच नागरिकांनीही वेळोवेळी सर्व विभागाच्या अधिकारी कर्मचारी यांना साथ देऊन आपल्या गावचा, परिसराचा विकास करून घ्यावा, असे प्रतिपादन सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्पाधिकारी कावली मेघना (भाप्रसे) यांनी केले.

येथील तहसील कार्यालयात महसूल पंधवडा निमित्त बधवारी (दि.०७) आयोजित विविध प्रमाणपत्र व योजनेसह नैसर्गिक आपत्तीचे धनादेश वाटप आणि उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी कर्मचारी यांच्या गौरव कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून त्या बोलत होत्या.

यावेळी किनवटच्या तहसीलदार डॉ. शारदा चौंडेकर, माहूरचे प्रभारी तहसीलदार कैलास जेठे, नायब तहसीलदार विकास राठोड, नंदन त्रिभूवन, रामेश्वर मुंडे, प्रकल्पाधिकारी कार्यालयाचे अधिक्षक अनिल कवडे मंचावर उपस्थित होते. याप्रसंगी आमदार भीमराव केराम यांचे स्वीय सहायक संतोष मरसकोल्हे यांनीही हजेरी लावली होती.

उत्तम कानिंदे यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले. याप्रसंगी तहसीलदार डॉ. चौंडेकर यांनीही आपले विचार मांडले. याप्रसंगी मयत जनावरांऐवजी नवीन पशुधन खरेदीसाठी अल्पभूधारक शेतकरी यांना मदत, घरपड लाभार्थी मदत, संजय गांधी निराधार योजने अंतार्गत लाभार्थींना मदत, दिव्यांगांना अंत्योदय, प्राधान्य कुटूंब योजना, नवीन ई - शिधापत्रिका, जात, रहिवाशी, उत्पन्न प्रमाण पत्र, वैयक्तिक वनहक्क मंजूर झालेल्या /डीएपी व गट नोंदणी प्रमाण पत्र वाटप, लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये उत्कृष्ट कार्य केलेल्या अधिकारी- मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

अतिदूर्गम वाघदरी येथील पाच अनुसूचित जमाती प्रवर्गातीला व पाच विमुक्त जाती भटक जमाती, इतर मागास प्रवर्गातील लाभार्थींना जातीचे प्रमाण पत्र वाटप करण्यात आले. वाघदरीच्या ग्रामस्थांनी मॅडम आमच्या गावी या , आमच्या समस्या पहा असे निमंत्रण दिल्यावरून सहायक जिल्हाधिकारी कावली मेघना म्हणाल्या , मूलभूत गरजांसाठी आवश्यक बाबींचा आपल्या ग्रामपंचायतीचा ठराव आम्हास द्या, आम्ही वरिष्ठांकडे पाठपुरावा करू, आपल्या गावी २० ऑगष्ट नंतर जरूर येईलच !

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अव्वल कारकून विजय सुरूशे, दीपाली पिंजरकर, कैलास कांबळे, महसूल सहायक पी.पी. सूर्यवंशी, गोविंद पांपटवार, पुसनाके, अर्चना कर्णेवाड, एस.बी. पवार, सविता रणखांब, फिरोज खान, लिंबेश राठोड, नामदेव धोंड, संतोष मुपडे, अमोल वाघाडे, मनोहर पाटील, वनहक्क व्यवस्थापक महेश राठोड आदिंनी परिश्रम घेतले.

## महात्मा ज्योतिबा फुले येथे शिल्प प्रदर्शन व जागरुकता कार्यशाळा संपन्न




लोकादेश न्यूज, किनवट : भारत सरकार च्या डेव्हलपमेंट कमिशन (हॅन्डक्राफ्ट) विभागा द्वारे संचालित हँडक्राफ्ट ऑफिस, औरंगाबाद यांच्यामार्फत महात्मा ज्योतिबा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे तीन दिवशीय शिल्प प्रदर्शन व जागरूकता या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी दि.०५ रोजी मार्गदर्शन मंचावरती अमन कुमार जैन, असिस्टंट डायरेक्टर हॅडक्राफ्ट औरंगाबाद, शैलेंद्र सिंग एच.पी.ओ. असिस्टंट औरंगाबाद, मिलिंद शिक्षण प्रसारक मंडळ, अंबाडीचे सचिव अभि. प्रशांत ठमके,कोषाध्यक्षा शुभांगीताई ठमके,उपप्राचार्य राधेश्याम जाधव उपमख्याध्यापक प्रमोद मुनेश्वर आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी अमन कुमार जैन यांनी महाराष्ट्रामध्ये अस्तित्वात असलेल्या हस्तकला कोल्हापूरची कोल्हापुरी चप्पल, सोलापूरची चादर, पैठणची पैठणी साडी, बंजारा हॅन्ड एम्ब्रेइडरी, पेबल आर्ट, वारली चित्रकला, अजिंठा चित्रकला, वूड क्राफ्ट आधी हस्तकला महाराष्ट्रात कशा पद्धतीने संवर्धन,प्रचार व प्रशिक्षण देण्याचे काम हस्तकला विभाग हे करत आहे याबाबत विस्तृत माहिती दिली.

या तीन दिवसीय कार्यशाळेच्या कार्यक्रमासाठी मास्टर ट्रेनर म्हणून प्रल्हाद पवार, पेबल आर्ट, सुंदरलाल कुमावत, वारली चित्रकला, अजिंठा चित्रकला, पूजा कांबळे,बंजारा हॅन्ड एम्ब्रेईडरी, शेख शाकीर, वूड आर्ट याबाबतचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देण्याकरता उपलब्ध होते.

कार्यक्रमाच्या शेवटच्या दिवशी दि.०७ रोजी राजेश जाधव चेअरमन बंजारा आर्ट फाउंडेशन, यवतमाळ हे उपस्थित होते. बंजारा हँडक्राफ्ट याचा उगम मुळात बंजारा समाजातील स्त्रिया या फावल्या वेळेमध्ये करत असत, यातूनच बंजारा हँड एम्ब्रॉयडरी ही कला ओळखल्या गेली. अशी माहिती राजेश जाधव यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून दिली.

या प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या हस्तकला व त्याची जोपासना कशा पद्धतीने करता येईल याबाबत प्रशिक्षण देण्यात आले. या कार्यक्रमास बहुसंख्येने विद्यालयातील विद्यार्थ्यांना सहभाग नोंदवला होता.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाचे पर्यवेक्षक आर.व्ही. इंगळे, पर्यवेक्षक,किशोर डांगे, शिक्षक श्याम जायभाये, ग्रंथपाल विशाल गिमेकर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. संतोष बैस ठाकूर यांनी केले तर आभार प्रा.सुबोध सर्पे यांनी मानले.

## रामेश्वर मुंडे यांची नायब तहसिलदारपदी नियुक्ती



लोकादेश न्यूज, किनवट,दि.०४: तहसील **कार्यालय,किनवट येथे संजय गांधी निराधार योजनेचे प्रमुख तथा कर्तव्यदक्ष अधिकारी रामेश्वर मुंडे यांची पदोन्नती झाली असून, गुरुवार, दि.०१ ऑगस्ट रोजी ते येथील उपविभांगीय कार्यालयामध्ये नायब तहसीलदार पदी रूजू झाले आहेत.**

तहसील मधील आपल्या कार्यकाळात मुंडे यांनी शेकडो गोरगरीब निराधार महिलांना मार्गदर्शन करीत, निस्वार्थपणे त्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून दिल्यामुळे, ते कार्यालयासह जनसामान्यातही निःस्पृह व मनमिळावू अधिकारी म्हणून लोकप्रिय होते. मागील कामाचा अनुभव त्यांना या नवीन जबाबदारीसाठी निश्चितच उपयोगी ठरेल असे मत त्यांना भावपूर्ण निरोप देतांना सहका-यांनी करून पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा दिल्यात.

## जिद्द चिकाटी मेहनत करून विद्यार्थी यशस्वी व्हावे - सहाय्यक जिल्हाधिकारी मेघना कावली



लोकादेश न्युज, किनवट :बळीराम पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय किनवट येथील करीअर कट्टा विभागाच्या वतीने आयोजित, आय. ए. एस. आपल्या भेटीला कार्यक्रम संपन्न.कार्यक्रमाच्या अध्यक्ष प्राचार्य डॉ. शिवराज बेंबरेकर होते.

प्रारंभी थोर समाज सुधारक बळीराम पाटील यांच्या अर्धपुतळयाची उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पूजा करण्यात आली. यावेळी मा. मेघना कावली उपविभागीय अधिकारी यांचे स्वागत बुके देवून प्राचार्य डॉ. एस. के. बेंबरेकर यांनी केले, तसेच याप्रसंगी मंचावर नायब तहसीलदार रामेश्वर मुंडे, एन. एम. त्रिभुवन, सहायक नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. पंजाब शेरे व डॉ. शुभांगी दिवे मंचावर उपस्थित होते, कार्यक्रमाचे संचालन व प्रास्ताविक प्रा. डॉ. आनंद भालेराव समन्वयक करीअर कट्टा यांनी केले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक आय. ए. एस. मेघना कावली मॅडम यांनी विध्यार्थी, विध्यार्थीनीना मार्गदर्शन केले, त्यांनी स्वतःच्या शिक्षण, नौकरी, व आय. ए. एस. कसे झाले त्याबद्दल व श्रद्धाड, उपासक, सेंट्रल सर्विसेस, ३० क्षत्र्ह कॅडर सर्विस, बँकिंग, रेल्वे, इन्शुरन्स व प्रशासकीय सेवा संदर्भात विषतृत माहिती दिली. प्रॉब्लेम समजा, ठरवा व सोडवा, आई - वडील व गुरूजणांचे मार्गदर्शन घ्या, ऑनलाईन व ऑफलाईन रिसॉर्श, टेस्ट सिरीयज चा वापर करून, जिद्द, चिकाटी व मेहनत करून जीवनात यशषवी व्हावे असे मार्गदर्शन केले, त्यानंतर विद्यार्थी, विद्यार्थीनींनी प्रश्न विचारले त्यावर मार्गदर्शनपर उत्तरे व शंकाचे निराकरन मॅडम ने केले,यावेळी प्रा. संतोष पवार, तनिष्का पिल्लेवार, दिशा बरडे, तेजशवी गायकवाड यांचा मॅडम च्या हस्ते सत्कार करण्यात आला. आभार प्रा. शेषराव माने रासेयो अधिकारी यांनी मानले, कार्यक्रमाच्या यशिवतेसाठी करीअर संसद मुख्यमंत्री अनुसया पवार व करीअर कट्टा सहभागी विध्यार्थी तसेच करीअर संसद पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

## किनवट-माहूर मतदारसंघाच्या निवडणूक प्रमुखपदी बाबूराव केंद्रे यांची नियुक्ती



लोकादेश न्यूज, किनवट : किनवट माहूर विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक प्रमुख पदी भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी बाबुराव केंद्रे यांची नियुक्ती केली आहे. प्रदेशाध्यक्ष यांनी केलेल्या बाबुराव केंद्रे यांच्या नियुक्ती चे आमदार भीमराव केराम यांच्या सहपदाधिकारी व कार्यककर्त्यानी स्वागत केले आहे. या नियुक्ती बद्दल आभार मानत बाबुराव केंद्रे यांनी भाजपाचे ज्येष्ठ नेते व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकळे, सरचिटणीस श्रीकांत भारतीय, यांचे आभार मानले आहे

## वयोश्री योजनेचे अर्ज स्विकारण्यासाठी संथागार वृध्दाश्रमामध्ये शिबीराचे आयोजन




लोकादेश न्यूज, किनवट : किनवट अजिंक्य बहुउद्देशीय सेवाभावी संस्था किनवट द्वारे चालवण्यात येणा-या संथागार वृद्धाश्रमामध्ये वयोश्री योजनेचे अर्ज स्वीकारण्यासाठी समाज कल्याण आयक्त शिवानंदन मिनगीरे यांच्या मार्गदर्शनाखाली दोन ऑगस्ट रोजी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. ६५ वर्षे वय किंवा त्यापेक्षा जास्त वय असलेल्या वृद्धांना आवश्यक असणारे उपकरणे जसे की श्रवण यंत्र चष्मा ट्रायपॉड व्हील चेअर फोल्डिंग वॉकर कमोड खुर्ची इत्यादी साहित्य खरेदी करण्यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत ही योजना राबविण्यात येत आहे या योजनेअंतर्गत एक वेळ एक रकमे ३००० रुपये लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे. ह्या कॅम्प साठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग नांदेड मार्फत श्रीमती अंजली नरवाडे,श्रिमती ममता गंगातीर, श्रिमती सिता काळे या उपस्थित होत्या. या शिबिराच्या उद्घाटन सत्राचे अध्यक्ष आमदार भीमराव केराम हे उपस्थित होते.

संथागार वृध्दाश्रमाचे संचालक अरुण आळणे (माजी नगराध्यक्ष) यांच्या आव्हानाला परिसरातील वृद्धांनी प्रचंड प्रतिसाद दिला. या शिबिरात पाचशेच्या वर अर्ज स्विकारण्यात आले. या कार्यक्रमासाठी माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, वैद्यकीय अधिकारी डॉ.अखिलेश पहुरकर, परिचारिका प्रिया घोगरे,परिचारिका सिमा बनसोड हे देखील उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संथागार परिवाराच्या प्रमख करुणाताई आळणे यांनी परिश्रम घेतले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ड.आकांक्षा आळणे यांनी केले.



**किनवट : बालविकास प्रकल्प अधिकारी श्रीमती अश्विनी ठकरोड यांनी आमदार भीमराव केराम यांचे जनसंपर्क कार्यालयातील मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना लाभार्थी महिला अर्ज स्वीकृती मदत केंद्रास भेट दिली. येथील फॉर्म भरण्यासाठी आलेल्या महिलांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी स्वीय सहायक प्रकाश कुडमते, संतोष मरस्कोल्हे, पिंटू गिनगुले, विवेक मडावी, पर्यवेक्षिका कचकलवार, मंजुळाताई कुमरे, जाधव मॅडम यांचेसह महिलांची उपस्थिती होती. (छाया–साजीद बडगुजर)**

## सहायक जिल्हाधिका-यांनी कारवाईचा इशारा देताच महामार्गावरील अनधिकृत फ्लेक्स हटले



लोकादेश न्युज, किनवट : किनवट - हिमायतनगर - माहूर राष्ट्रीय महामार्गावरील दुभाजकासह इतरही सार्वजनिक ठिकाणी अनधिकृतपणे विविध फ्लेक्स लावल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होत होता.याबाबत किनवटच्या सहायक जिल्हाधिकारी मेघना कावली यांनी संबंधित अधिकाऱ्यांना कारवाईचा इशारा देताच मंगळवारी अनधिकृत बॅनर हटविण्यात आलो. हिमायतनगर ते माहूर या राष्ट्रीय महामार्गावरील रस्ता दुभाजकावरील पथदिव्यांच्या खांबांसह आजूबाजूला तसेच सार्वजनिक ठिकाणी विनापरवानगी विविध राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांचे वाढदिवस व इतर कार्यक्रम तसेच प्रतिष्ठानांचे अनधिकृत फ्लेक्स लावण्यात येत आहेत.यात भर म्हणजे दुभाजकांत झाडे लागण्याऐवजी विविध चौकांचे नामकरण करण्यात आले आहे.बहुतांश ठिकाणी रस्त्यावर लावणाऱ्या बॅनरला लाकडांचा आधार दिला जात आहे.सततच्या पावसामुळे लाकडे कुजून बॅनर कोसळल्यास पादचारी तसेच वाहनचालकांच्या जीवितास धोका होण्याची शक्यता नाकारता येत नाही.ही बाब विदारक असल्याचे लक्षात घेवून किनवटच्या सहायक जिल्हाधिकारी मेघना कावली यांनी सोमवारी दि.५ किनवट - माहूर पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांसह दोन्ही ठिकाणचे मुख्याधिकारी,गोकुंदा व सारखणी येथील सरपंच तसेच ग्रामसेवक यांना नोटिसा देऊन २४ तासाच्या आत वरील रस्त्यावरील अनधिकृत फ्लेक्स काढून घेण्याचे आदेश दिले.विहित कालावधीत फ्लेक्स हटविण्याची कारवाई न केल्यास संबंधित अधिकारी,कर्मचारी यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याचा इशाराही नोटिसीत दिला होता.सहायक जिल्हाधिकाऱ्यांच्या नोटिसीची दखल घेत पालिका व संयुक्त पथकाने मंगळवारी सायंकाळपर्यंत रस्त्यावरील अनधिकृत फ्लेक्स हटविले.

## प्रा.शिवदास बोकडे सेट परीक्षा उत्तीर्ण



लोकादेश न्यूज, किनवट बळीराम पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील मुक्त विद्यापीठाचे केंद्र संयोजक प्रा. शिवदास बोकडे हे राज्यशास्त्र विषयात नुकत्याच संपन्न झालेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्यावतीने घेण्यात आलेल्या राज्य पात्रता परीक्षेत यश संपादन केले आहे. सेट या महत्त्वाच्या परीक्षेत यश मिळविल्याने किनवट आणि किनवट परिसरात त्यांचे कौतूक होत आहे. त्यांच्या या यशाबद्दल किनवट शिक्षण संस्था किनवट चे अध्यक्ष प्रफुल राठोड, सचिव शंकरराव चाडावार, उपाध्यक्ष गंगारेड्डी बैनमवार, उपाध्यक्ष नारायणराव सिडाम, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.के. बेंबरेकर, प्रा. राजकुमार नेम्मानिवार,डॉ.आनंद भालेराव, पर्यवेक्षक प्रा. अनिल पाटील, प्रा. किशन मिराशे, प्रा.विजय खूपसे, प्रा. ममता जोनपेल्लीवार, डॉ. प्रज्ञा घोडवाडीकर,डॉ. योगेश सोमवंशी,डॉ. गजानन वानखेडे, प्रा. आम्रपाली हाटकर, प्रा मंदाकिनी राठोड, डॉ. लता पेंडलवाड, प्रा. पुरूषोत्तम येरडलावार, प्रा. डि. टी. चाटे, श्री रेणुका देवी महाविद्यालय माहूरचे प्राचार्य डॉ. टी.एम गरणुले,डॉ. लोणे, न्ड्ष्ठ चे केंद्र संयोजक प्रा. बाबासाहेब राठोड, प्रा.अजय पाटील, प्रा.राहुल मुनेश्वर, प्रा.सुशील मूनेश्वर, प्रा. राऊलवाड, प्रा.वाम्शी, प्रा.जय चव्हाण,सूरज आढागळे श्रीराम खिल्लारे, संजय थोरात शुभम गाजलवार प्रदीप जाधव इत्यादींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.




साप्ताहिक लोकादेशचे मालक, प्रकाशक, संपादक **साजीदोद्दीन शरफोद्दीन बडगुजर** यांनी मुद्रक **शेख राजीक शेख खाजामिया** यांच्या हिंदूस्थान ऑफसेट प्रिंटींग प्रेस, हनुमान मंदिर जवळ किनवट ता.किनवट जि.नांदेड-431 804 (महा.) येथे मुद्रित करून बडगुजर भवन मोमीनपुा, किनवट ता.किनवट जि.नांदेड-431 804 (महा.) येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR/2007/20732 फोन/फॅक्स नं. (02469) 221666 भ्रमणध्वनी : 09850900628 ईमेल : sajidbadgujar@gmail.com, lokadesh@gmail.com